




मोठे बंधू नासिर हुसेन यांच्यासह

मी हलकेफुलके चित्रपट बनवतो - ताहिर हुसेन



लता मंगेशकर, अनु मलिक आणि अनवर पाशासह




ल ढूंढता है चे कलाकार दिव्या शोअेब खान आणि श्रीदेवीसह

आजची पिढी ताहिर हुसेनना आमीरचे वडील म्हणून ओळखत असली तरी निर्माता म्हणून अनेक हिट चित्रपट त्यांच्या खाती जमा आहे. कारवां, अनामिका आणि हम है राही प्यार के हे त्यातले महत्त्वाचे चित्रपट. ताहिरसाहेब दिल ढूंढता है नावाच्या आपल्या आगामी चित्रपटाच्या निर्मितीत सध्या व्यग्र आहेत. त्याबद्दल 'जी'कडे त्यांनी व्यक्त केलेलं मनोगत...

□ विजय अकेला

सर्वप्रथम तुमच्या अंकाला नववर्षाच्या शुभेच्छा! हे वर्ष माझ्यासाठीही अनेक आशा घेऊन येणारं आहे.

माझ्या चित्रपटांत नवोदितांना संधी देण्याचा मी नेहमीच प्रयत्न करत आलोय. रघुनाथ झालानी, राजा ठाकूर, देश गौतम, मेहुलकुमार, रमेश आहुजा, अनवर पाशा आणि विक्रम भट नवोदितच होते ना, *तुम मेरे हो*द्वारा मी स्वतःला संधी दिली होती(हसतात). जी गोष्ट दिग्दर्शकांची तीच गीतकार, संगीतकार आणि कलाकारांची. राकेश रोशन, महेंद्र संधू,



कारवां



रीना रॉय, राज बब्बर, बप्पी लाहिरी, गौहर जॉनपुरी, फारूख केसर हे सगळे माझे फ्राईंड आहेत.

संगीत ही माझ्या चित्रपटाची जमेची बाजू आहे. माझ्या आवडीच्या दहा गीतांची क्रमवारी लावायची तर ती याप्रमाणे लावता येईल...

१. *'कितना प्यारा वादा है इन मतवाली आंखों का...'*(*कारवां*)

२. *'मेरी भीगी भीगी सी पलकों में रह गये...'*(*अनामिका*)

३. *'नथनी मोरी डोले...'*(मदहोश)

४. *'फिर जनम लेंगे हम...'*(*फिर जनम लेंगे हम*)

५. *'माथे पे सोनेकी बिंदिया जमाई...'*(*खून की पुकार*)

६. *'जलता है जिया मेरा भीगी भीगी रातों में...'*(*जख्म*)

७. *'दुल्हा बिकता है यारों खरीदोगे...'*(*दुल्हा बिकता है*)

८. *'मेरे मेहबूब रुक जाओ...'*(हमारा खानदान)


९. *'घूंघट की आड में...'*(*हम हैं राही प्यार के*)

१०. *'बादल को गरजने दो...'*(*दिल ढूंढता है*)

मी आणि संजीवकुमार खास मित्र. माझ्या *अनामिका*चा तोच नायक होता. मद्याचा जबरदस्त शौकीन. आमची घरं जवळजवळ होती. त्यामुळे अनेकदा रात्री उशिरापर्यंत आमच्या गप्पा रंगायच्या.

जया भादुरी माझी आवडती अभिनेत्री. *अनामिकात* तिने केलेल्या अभिनयाला तोड नव्हती. ती खरोखरच हाडाची अभिनेत्री आहे.

अल्लाच्या कृपेनेच मी इंडस्ट्रीत आलो. लखनौला शिक्षण झालं. पण शिक्षणात माझं फारसं लक्ष नव्हतं. चित्रपटांचं प्रचंड वेड होतं. परीक्षा न देता मी चित्रपट पहायला पळायचो. हिंदी-इंग्रजी दोन्ही चित्रपट मी आवडीने पाहात असे. कॉपी करू परीक्षेत जेमतेम पास होत असे.



आगामी चित्रपट *दिल ढूंढता है*चं एक दृश्य

त्यादरम्यान माझे मोठे बंधू नासिर हुसेन यांनी लेखक म्हणून इंडस्ट्रीत चांगलं नाव कमावलं होतं. त्यांच्याच मदतीने मी मुंबईला आलो. सात-आठ वर्षं त्यांच्याकडे सहाय्यक म्हणून काम केलं. *तुम सा नही देखा, दिल देके देखो* आणि *फिर वही दिल लाया हूं*मध्ये अभिनयही केला. होय, मी स्टेज आर्टिस्ट होतो हे फार थोड्या लोकांना माहिती असेल. बलराज साहनींबरोबर नाटकात कामं केलेली होती. तीही एक-दोन नाही तर चांगली दहा वर्षं *दिल ढूंढता है*मध्ये सुद्धा माझा स्पेशल ॲपिअरन्स आहे.


मी स्वतंत्रपणे निर्मिती सुरू केली ती *कारवां*पासून. या पहिल्याच चित्रपटाचं दिग्दर्शन मोठ्या बंधूंवर सोपवलं. *कारवां*चं नाव घेतलं की पंचमदांच्या संगीताचा उल्लेख टाळताच येत नाही.

मला खुलणाऱ्या विषयांत जास्त रस वाटतो. गीत-संगीत आणि नृत्य या तिघांची कथानकाला जोड मिळाल्यावर चित्रपट अप्रतिमच बनतो. गंभीर चित्रपट बनवणं मला आवडत नाही. मी आजवर कधीच तसा प्रयत्न केला नाही. माझे हलकेफुलके चित्रपट दर्शकांचं मनोरंजन करतात. ही शिकवण अर्थातच नासीरभाईसाहेबांची. ते नेहमी म्हणत, जगात मनस्ताप खूप आहेत. त्यावर तीन तासांचा उतारा द्यायला म्हणून चित्रपट बनवा.

माझे गुरू, मोठे भाऊ आम्हाला सोडून पैगंबरवासी झाले तो दिवस माझ्या आयुष्यातला सगळ्यात वाईट दिवस होता. त्यांचा मोठा मुलगा मन्सूर याने दिग्दर्शनाची सूत्रं सांभाळली त्याचवेळी आमीरनेही अभिनयात



अनामिका



लॉकेट








निर्माता ताहिर हुसेन यांची फिल्मोग्राफी

क्रम.	चित्रपट	कलाकार	दिग्दर्शक	गीतकार-संगीतकार
१.	*कारवां*	आशा पारेख-जितेंद्र	नासीर हुसेन	मजरुह-राहुल देव बर्मन
२.	*अनामिका*	संजीवकुमार-जया भादुरी-हेलन	रघुनाथ झालानी	मजरुह-राहुल देव बर्मन
३.	*मदहोश*	महेंद्र संधू-रीना रॉय, राकेश रोशन-मा. आमीर खान	गौतम	मजरुह-राहुल देव बर्मन
४.	*फिर जनम लेंगे* गुजराथीमध्ये *जनम जनमना साथी*	आदिल अमान-भावना भट्ट-अमजद खान	मेहुलकुमार	गोहर कानपुरी-बप्पी लाहिरी
५.	*खून की पुकार*	विनोद खन्ना-शबाना-अरुणा ईरानी	रमेश आहुजा	हसरत-कानपुरी-बप्पी लाहिरी
६.	*जख्मी*	सुनील दत्त-आशा पारेख-रीना रॉय	राजा ठाकुर	— -बप्पी लाहिरी
७.	*दुल्हा बिकता है*	राज बब्बर-अनीता राज-सिंपल कापडिया	अनवर पाशा	गोहर कानपुरी-बप्पी लाहिरी
८.	*लॉकेट*	जितेंद्र-रेखा-विनोद मेहरा	रमेश आहुजा	गोहर कानपुरी-बप्पी लाहिरी
९.	*हमारा खानदान*	आशा पारेख-ऋषी कपूर-फरहा	अनवर पाशा	फारुख कैसर-लक्ष्मीकांत प्यारेलाल
१०.	*तुम मेरे हो*	आमिर खान-जूही चावला-सुधीर पांडे	ताहिर हुसेन	मजरूह/आनंद-मिलिंद
११.	*हम है राही प्यार के*	आमिर खान-जूही चावला-दिलीप ताहिल	महेश भट्ट	समीर/नदीम-श्रवण
१२.	*मदहोश*	फैजल खान-अंजली	विक्रम भट्ट	समीर/आनंद-मिलिंद
आगामी चित्रपट				
१३.	*दिल ढूंढता है*	दिव्या-शोएब खान-देवती	अनवर पाशा	ताहिर हुसेन-अनु मलिक











१) *जख्मी* २) *खून की पुकार* ३) *फिर जनम लेंगे हम* ४) *हम है राही प्यार के* ५) *हमारा खानदान* ६) *तुम मेरे हो* ७) *दुल्हा बिकता है* ८) *मदहोश*

पदार्पण केलं होतं. तसं नासीरभाईंच्या मार्गदर्शनाखाली *मदहोश*मध्ये आमीरने बालकलाकार म्हणून काम केलं होतं.

अनेकदा निर्माते फक्त पैसे फेकून मोकळे होतात. सेटवर बाकी काय चाललंय याचा त्यांना गंधही नसतो. पण मी मात्र कथानकापासून निर्मितीच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींकडे स्वतः लक्ष पुरवतो. संपूर्ण प्रोजेक्टवर माझं नियंत्रण असतं.

अल्लाने आमीरसारखा हुशार आणि समंजस मुलगा दिल्याबद्दल मी त्याचा सदैव ऋणी राहीन. तो प्रतिभावंत कलाकार आहे. निर्माता म्हणून *लगान*मध्ये त्याने जे अफाट यश मिळवलं ते गेल्या तीस वर्षांतही मला मिळवता आलेलं नाही.

आमीरने या क्षेत्रात यावं असं मला अजिवात वाटत नव्हतं. पण भाईजानना त्याची रूची आणि प्रतिभा जाणवली. *मंजिल मंजिल*सारख्या अनेक चित्रपटांत त्याला सहाय्यक म्हणून त्यांनी हाताशी घेतलं.

नंतर अचानक त्यांनी *कयामत से कयामत तक*मधून आमीरला लॉंच करण्याचा विचार मला सांगितला. त्यांना नाही म्हणण्याची माझी हिंमतच नव्हती. अर्थात त्यांची पारख चुकीची नव्हती. मी आमीरला निर्धास्त होऊन त्यांच्या हाती सोपवलं.

सध्या मला शायरीत रस वाटू लागलाय. *दिल ढूंढता है*ची गीतं मीच लिहिली आहेत. माझ्या *शबनम* या नव्या मालिकेचं शीर्षकगीतही मी लिहिलंय त्याचे बोल आहेत...

शबनम होती है आसमानों से हर रोज
मैं इस आंखो से हर रात रोती हूं
- और भी हूं खुदा ने जमीं पर मुझे क्यों भेजी
हर करवट पे तडपती हूं और हवास खोती है

माझा नवा चित्रपट प्रदर्शनासाठी तयार आहे. तो माझ्या कारकिर्दीतला सर्वश्रेष्ठ चित्रपट ठरेल. आमीर आणि सुभाष घई दोघांनी तो बघितलाय. दोघांनीही पसंतीची पावती दिल्याने माझाही उत्साह वाढलाय.

मी निर्माता म्हणून स्वतःला ८० टक्के यशस्वी मानतो. बाकी दर्शकांची मर्जी! अल्लाच्या कृपेने ती नेहमीच माझ्यावर राहिली आहे.